# *गुरुमाई चिद्विलासानंद यांच्या शिकवणी*

## जबाबदार बना

*सायंकालीन आरती*

*शनिवार, २१ मार्च, २०२०*

*भगवान नित्यानंद मंदिर*

कोणत्याही दिवशी सांगण्यासारखे काय असते, फक्त हेच की, तुम्ही जे करत आला आहात ते करत राहा—आणि ते विचारपूर्वक आणि काळजीपूर्वक करा. तुम्हाला जे माहित असायला हवे आहे ते सांगितले गेले आहे, आणि पुन्हापुन्हा सांगितले गेले आहे.

***

कोणत्याही दिवशी तुम्हाला कसे वाटते, काय वाटते, ते तुमच्या कर्मांचे फळ असते. म्हणून, तुम्हाला जे वाटावे अशी तुमची इच्छा आहे, तेच वाटावे हे सुनिश्चित करण्याची जबाबदारी तुमची आहे.

इतरांना काय वाटते—ही खरेतर तुमची जबाबदारी नाही. तुम्ही काय करता, काय बोलता आणि काय विचार करता याची जबाबदारी तुमच्यापैकी प्रत्येकाने घेणे आवश्यक आहे. तुम्हाला ठाऊक आहे की, मी काय शिकवते. जबाबदारी तुमची आहे, मग तुम्हाला त्याचे पालन करायचे असो किंवा नसो.

जबाबदारीविषयी बोलायचे झाले तर, हे लक्षात ठेवा की, एखाद्या विशिष्ट भावनेमध्ये गढून जायचे आहे किंवा नाही याचे नियंत्रण पूर्णतः तुमच्या हातात आहे. हे सुनिश्चित करण्याची पूर्ण जबाबदारी घ्या की, तुम्ही बोलण्याची आवश्यकता असेल, तेव्हा तुम्ही बोलाल. जिथे तुमची आवश्यकता असेल, तिथे हजर राहा. आणि जिथे तुम्ही असण्याची आवश्यकता नसेल, तिथे थांबू नका.

स्मरणात ठेवा : जबाबदारी अर्थात् उत्तरदायित्व म्हणजे तुमच्या क्षमतेला तुमचे उत्तर. तुमच्यापाशी सामर्थ्य आहे, हे जाणून तुम्ही अनुभवले पाहिजे की, तुम्ही सबळ आहात. त्यामुळे, तुम्हाला कसे वाटते आणि काय वाटते हे तुमच्या आवाक्यात असते. तुमच्याकडे जे आहे, तुमच्यात ज्या क्षमता आहेत त्यांचा अभिमान बाळगा.

नेहमी लक्षात ठेवा की, तुम्ही माझ्या विचारांमध्ये आहात, तुम्ही माझ्या प्रार्थनांमध्ये आहात, तुम्ही माझ्या जागरूकतेत आहात. मी तुमच्यासाठी सदैव सर्वोत्कृष्टच चिंतत असते. मला सदैव हे माहित आहे, तुमच्या हृदयात भगवंताच्या प्रकाशाचा वास आहे.

जबाबदार बना.
    जबाबदार बना.
        जबाबदार बना.
            मंदिरात राहा!

जबाबदार बना. मंदिरात राहा.

तुमचे शरीर भगवंताचे मंदिर आहे.
    जबाबदार बना. मंदिरात राहा.

तुमचे मन भगवंताचे मंदिर आहे.
    जबाबदार बना. मंदिरात राहा.

तुमचे घर मंदिर आहे.
    जबाबदार बना. मंदिरात राहा.

तुम्ही जिथे कुठे आहात, असे समजा की तुम्ही मंदिरात आहात.

तुम्हाला जर वाईट वाटत असेल, तर वाईट वाटू द्या आणि मग त्यातून बाहेर या.
    तुम्हाला जर खूप छान वाटत असेल, तर त्याहूनही छान वाटण्यासाठी प्रयत्न करा.
        तुम्ही जर आनंदी असाल, तर त्याहूनही अधिक आनंद अनुभवा.

आणि तुम्ही जर दुःखी असाल, तर त्यातून बाहेर या. मी असे का म्हणते आहे, “त्यातून बाहेर या?” मी समजावून सांगते. मला असे म्हणायचे नाही की, ते बाजूला सारा. माझ्या म्हणण्याचा अर्थ असा आहे की, त्यातून बाहेर पडण्याचा *मार्ग शोधा.* उदाहरणार्थ, एखाद्या पर्वताची चढण करत असताना तुम्ही कधीकधी थकता. तुम्हाला दम लागतो. तुम्हाला असे वाटू लागते की, आता तुम्ही अजून वर चढू शकणार नाही. पण मग, अंदाज बांधा? तुम्ही मार्ग *शोधूनच काढता!* का? कारण तुमच्यापाशी एक संकल्प आहे, तुमच्यापाशी एक उद्देश आहे—शिखर गाठण्याचा. आणि तोच तुमच्या अस्तित्वाला नव्या

ऊर्जेने भरून टाकतो, ज्यामुळे तुम्हाला पर्वतारोहण करत राहण्याचे बळ मिळते.

त्याचप्रमाणे, तुम्ही जर दुःखी असाल, तर त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग शोधून काढा. आणि तुम्ही जर आनंदी असाल, तर त्या भावनेत आणखी आनंदाची भर घाला. असे केल्याने तुम्ही आणखी ऊर्जेने भरून जाल. तुम्ही कोणतीही गोष्ट अद्‌भुत बनवू शकता, खरे तर, *अधिकच* अद्‌भुत बनवू शकता. बडे बाबा प्रत्येक दिवशी अधिकाधिक अद्‌भुत दिसतात, नाही का?

© २०२० एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.